UGC Vidyawarta Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

Special Issue February 2018

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal

Jawahar Education Society's

# Vaidyanath College

Parli-Vaijnath, Dist.Beed (Maharashtra)

**Reaccredited by NAAC with 'B' Grade (CGPA2.53)**

Affiliated to Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad.

## National Seminar
## on
# Disaster Management

3rd February,2018

**Organized By**

Department of Public Administration & Geography

Chief Editor

**Dr.Ippar R.K.**

Principal, Vaidyanath College & Senate Member,
Dr.BAMU,Aurangabad

Editor

**Dr.J.B.Kangane**
Head Dept. of Public Administration

**Dr.V.L.Phad**
Head Dept. of Geography

53) महानगरपालिकेतील आपत्ती व्यवस्थापनात महिलांचा सहभाग व जनजागृती
**प्रा. डॉ.यु. एल. इंगळे & प्रा. एस.एन. कदम , परळी (वै.)** || 163

54) बंगालच्या उपसागरास मिळणाऱ्या नदयांचे वर्गीकरण
**प्रा.डॉ.पिसाळ एस.जी. & कांबळे जयानंद राम, बनसारोळा** || 165

55) आपत्ती व्यवस्थापन आणि प्रशासनाची भुमिका
**प्रा.कातळे संगिता गुलाबराव, जि.बीड** || 167

56) आपत्ती व्यवस्थापनात शासकीय यंत्रणेची भुमिका
**डॉ. संतोश बाबुराव कु—हे, जि. परभणी** || 170

57) आपत्ती व्यवस्थापनातील लोकसहभाग
**प्रा. लहाने बळीराम शिवाजी, औसा** || 173

58) आपत्ती व्यवस्थापनात प्रशासनाची भूमिका आणि आव्हाने
**डॉ. पी. एस. लोखंडे, परभणी** || 175

59) मानव निर्मिती आपत्तीची कारणे परिणाम आणि उपाय
**प्रा.शर्मिष्ठा शदर लोमटे, अंबाजोगाई** || 177

60) फटाका बाजारपेठेचे व्यवस्थापन : जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेपुढील आव्हान
**प्रा. डॉ प्रविण लोणारकर, परभणी** || 179

61) मानव निर्मित आपत्ती : संप व टाळेबंदी
**प्रा.डॉ.एम.डी. कच्छवे ,जि.परभणी** || 183

62) दुष्काळ आपत्तीचे स्वरूप व व्यवस्थापन
**प्रा.डॉ.मादळे आर.बी., जि.नांदेड** || 185

63) मानवनिर्मित आपत्ती आणि लोकसंख्या वाढः कारणे, परिणाम आणि उपाय
**प्रा. डॉ. वसंत पांडुरंग सरवदे, जि. परभणी** || 188

64) आपत्ती व्यवस्थापनः लोकसहभाग व जनजागृती
**प्रा. डॉ. संतराम पी. मुंढे, जि. लातूर** || 190

65) "नैसर्गिक अपत्ती व्यवस्थापन व उपाय एक भौगोलीक अभ्यास"
**प्रा.डॉ राठोड सुर्यकांत लालचंद, जि. उस्मानाबाद** || 194

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

https://sites.google.com/site/vidyawartajournal http://www.vidyawarta.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 UGC Approved Jr.No.62759 Vidyawarta® Special Issue February 2018

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth 0183 Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



धोका वाढू शकतो. तसेच अशी तात्पुरती दुकाने आगीच्या प्रसाराला कारणीभूत ठरतात, त्यामुळे प्रशासनाने कायमस्वरुपी व पक्की दुकाने उपलब्ध करुन दिल्यास आपत्तीची संभाव्यता कमी होईलच, त्याचबरोबर व्यावसायिकांना विमा संरक्षण देखील प्राप्त होईल.

**संदर्भ ग्रंथ**


१) Austin Eapen, Uttarakhand Disaster- Awake Up Call:, Indian Journal of Public Administration, Vol LX April-June २०१४ The Indian Institution of Public Administration, Delhi.

२) Vinod Kumar, Disaster in Himachal Pradesh and main Mitigation strategies for Disaster, Vol LIX January-March २०१३, Indian Journal of Public Administration, Vol LX April- June २०१४ The Indian Institution of Public Administration, Delhi.

३) Marathe P.P ‡ Concepts and Practice in Disaster Management, D.M Colour, Pune

४) Disaster Management Act २००५, Gov. of India.

५) Training Module on Disaster Management, YASHDA, Pune

६) पठारे, चाकणे, आपत्ती निवारण, डायमंड पब्लिकेशन पुणे, २००७.

७) दै. लोकसत्ता


❑❑❑

# मानव निर्मित आपत्ती : संप व टाळेबंदी

**प्रा.डॉ.एम.डी. कच्छवे**
वाणिज्य विभाग प्राध्यापक सहयोगी प्राध्यापक ,
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, ता. सोनपेठ जि.परभणी

**प्रस्तावना (Intooduction) :**

'आपत्ती' ह्या एकेकट्या येत नाही. त्या एकत्रीत येत असतात. आपत्तीमुळे मालमत्तेची प्रचंड हानी होत असते. त्याचे समाजात आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतीक क्षेत्रात परिणाम दिसून येतात. भोपाळची वायूगळती, त्सुनामीमुळे अजूनही लोक त्यातून सावरलेले नाहीत. आपत्ती प्रामुख्याने नैसर्गिक आणि मानवनिर्मित असतात. नैसर्गिक आपत्तीत भूकंप, ज्वालामुखी, भूमीपात, चक्रीय वादळे,महापूर, दुष्काळ, हिमवादळे, त्सुनामी लाटा इत्यादीचा समावेश होतो. कोणत्याही प्रकारची आपत्ती ही घातकच असते.

आपत्तीला इंग्रजीत Disaster म्हणतात. Dis व Aster या दोन्ही शब्दापासून तयार झाला आहे. Dis चा अर्थ bas म्हणजे वाईट आणि Aster म्हणजे Star किंवा तारा होतो. यावरुन 'Disaster' चा अर्थ वाईट तारा असा करता येतो. वाईट तारा म्हणजेच आपत्ती होय. आकस्मिकपणे ओढवलेले मोठे दूर्दैवी संकट म्हणजे आपत्ती होय. कोणत्याही आपत्तीमुळे मानव जातीवर वरिष्ठ कोसळत असते. यासाठी भारत सरकारने २३ डिसेंबर, २००५ रोजी 'आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५' नावाने अमलात आला.

भारतात १९२९ मध्ये औद्योगिक संबंध विषयीचा पहिला कायदा झाला.चौदा दिवसाची आगाऊ सूचना दिल्या शिवाय कामगारांना संप करता येत नाही १९४७ मध्ये औद्योगिक कलह अधिनियम मंजुर करण्यात आला औद्योगिक संबंधा बद्दल देशातील सर्वात महत्वाचा हाच अधिनियम आहे. एकोणीसाव्या शतकात वाफेच्या इंजिनाचा शोध लागला आणि औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली. उत्पादन पध्दतीत आमुलाग्र बदल झाला. मोठ्या प्रमाणात उत्पादन निघू लागले. मालक व कामगार हे दोन स्वतंत्र वर्ग निर्माण झाले. जास्तीत जास्त नफा कमविणे ही मालकांची भूमीका राहीली

Late Ramesh Warpudkar ACS College, Sonpeth, Pin-431516, Ta.Sonpeth Dist.Parbhani


आणि कामगाराची अधिक वेतन मिळावे असे वाटू लागले. या दोन परस्पर विरोधी भुमिकामुळे मालक व कामगार यांच्यातसंघर्ष निर्माण होतो. यांचे पर्यवसान संप व टाळेबंदीत होते. या दोघांच्या परिणाम एकच उत्पादन कार्यात खंड पाडणे.

**संशोधनाचे उद्देश :**

सदर शोध निबंधासाठी खालील उद्देश निश्चित करण्यात आले आहेत.

आपत्तीची संकल्पना स्पष्ट करणे.

संप आपत्तीचा अभ्यास करणे.

टाळेबंदीचा अभ्यास करणे.

संप व टाळेबंदीच्या वेळी व्यवस्थापन करणे.

**गृहीतकृत्ये :**

कामगार अन्यायाच्या विरुध्द संप पुकारतात. यामुळे कारखान्यास फटका बसतो.

मालक टाळेबंदी करतात. त्यामुळे कामगारांचे अतोनात नुकसान होते.

संप व टाळेबंदीमुळे समाजाचे नुकसान होते.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोध निंबध हा दुय्यम साधन सामुग्रीवर आधारित आहे. त्यामुळे संदर्भग्रंथ, मासिके, दैनिक वर्तमान पत्रातील लेख व इंटरनेट सुविधा इत्यादी व्दितीय साधनाचा वापर केलेला आहे.

**संप व टाळेबंदी (Strike and Lock - Out) :**

औद्योगिक किंवा कारखानदारी क्षेत्रातील मानव निर्मित आपत्ती म्हणजे संप व टाळेबंदी होय. संप किंवा टाळेबंदी हे एक प्रकारे शस्त्र असते. 'संप' हे शस्त्र कामगार किंवा मजुर वर्गाकडून उपयोगात आणले जाते. मालकाकडून 'टाळेबंदी' या शस्त्राचा वापर करण्यात येतो. कंपनीतील कामगार हे संघटीतरित्या उत्पादन थांबवितात किंवा काम करण्यास नकार देतात. मजूरांच्या मनाविरुध्द कारवाई होते. त्यावेळी संबंधीत आपला रोश, असंतोष दाखविण्यासाठी एकत्रीत येऊन काम बंद पाडतात. उत्पादन कार्य बंद पडते. या प्रक्रियेला संप या नावाने ओळखले जाते. संप करतांना कामगार कारखानदारीतील चक्काजाम करतात. उत्पादन थांबविण्यात येते. मालकाला कामगारांशी बोलणी करण्यास तयार करण्यात येते. कारखानदाराला संपाची पूर्व सुचना दिली जाते. संपाचा कालावधी अनिश्चीत असतो.

**संप आपत्ती (Strike Disaster) :**

संप म्हणजे उद्योगधंद्यातील कामगारांनी सामुहीक विचाराने किंवा एकमताने पूर्णतः किंवा अंशतः काम थांबविण्याचा घेतलेला निर्णय होय. संप हा कामगार कारखाना फायद्याच्यावेळी करण्याचा प्रघात आहे. ज्यावेळी कारखान्याला मोठ्या प्रमाणात मालाचा पुरवठा करावयाचा असतो अशावेळी असंतोषाने घुमसत असलेले कामगार कामावर जात नाहीत. कारखानदारीच्या व्यवस्थापना विषयी अपप्रचार करतात. या कामगारांच्या कृत्यामुळे कारखान्यास मोठा फटका बसतो. मोठ्या प्रमाणात नुकसान होते. दिर्घकाळ चालणाऱ्या संपामध्ये अनेक कुटूंबांना त्रास होतो. कांही प्रसंगी अनेकांचे संसार उध्दवस्त होतात. संपकाळात संपाची झळ फक्त मालक किंवा कामगारांना पोहचत नाही तर सर्व सामान्य लोकांनाही त्रास होतो. संपामुळे समाजजीवन विस्कळीत होते. संप किंवा टाळेबंदी संदर्भात औद्योगिक संबंध महत्वाचे असतात. कारखान्यातील कामगार आणि कारखान्याचे मालक यांच्यात चांगला सुसंवाद असल्यास कारखाने व्यवस्थीतपणे चालतात. कारखान्यातील मालाचा दर्जासुध्दा चांगल्या स्वरुपात कायम राहतो. मालक व कामगार यांच्यातील संबंध चांगले कसे राहतील हे संबंध बिघडणार नाहीत यांची काळजी घेणे आवश्यक आहे. कारखान्यातील कामगारांनी पुकारलेल्या संपाच्यावेळी कारखान्याची मालमत्ता आणि त्या सर्व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी सुरक्षा व्यवस्थेवर असते.

**टाळेबंदी (Lock Out) :**

टाळेबंदी म्हणजे मालकाने आपल्या उद्योगधद्याची जागा बंद ठेवणे, काम स्थगित ठेवणे किंवा नोकरीवर असललेल्या कामगारांची नोकरी पुढे चालू ठेवण्यास नकार देण्याचा निर्णय होय. संप आणि टाळेबंदी हे अनुक्रमे कामगार आणि मालक यांच्याजवळील एक प्रभावी अस्त्र होय. औद्योगिक कलहा बाबत इतर सर्व शक्य मार्गाचा अवलंब केल्यानंतर कलह मिटत नसेल तर एक शेवटचा पर्याय म्हणूनच संप किंवा टाळेबंदीचा संबंधीतांनी वापर करावा अशी कायद्याची अपेक्षा आहे.संप टाळेबंदीचे परिणाम मालक व कामगारांप्रमाणेच समाजाला भोगावे लागतात. संप व टाळेबंदीचा मार्गाचा आवश्यक तेव्हाच उपयोग व्हावा म्हणून औद्योगिक कलह कायद्यात कांही निर्बंध घातले आहेत.

टाळेबंदीची कार्यवाही मालकातर्फे होत असते. कामगारांची एकत्रित शक्ती विफल करण्यासाठी मालक टाळेबंदीचा उपयोग करतात. औद्योगिक कलह कायद्यानुसार टाळेबंदी म्हणजे, " मालकाव्दारे काम करण्याचे ठिकाण बंद करणे किंवा काम स्थगित करणे किंवा कामावरील सर्व किंवा कांही श्रमीकांना कामावर घेण्यास नकार देणे म्हणजे टाळेबंदी."

कामगार आणि मालक यांच्यात सहानुभूतीची नाते जोपासले जाणे आवश्यक असते. परंतु प्रत्यक्षात कामगारआणि मालकात नोकरी संदर्भात .करार झालेला असतो.त्या करारानुसार

कामगाराने नोकरी करणे आवश्यक हुकूम कामगारांने मानला नाही तर मालक कामगाराला नोकरीवरुन काढण्याचा प्रयत्न करतो. त्यातुनच संपाची कार्यवाही उदभवू शकते.

टाळेबंदी म्हणजे कामगार आणि कारखानदार यांच्यातील व्यवस्थापन, संबंध बिघडण्याची अंतिम व्यवस्था होय. कारखाना बंद करुन टाळेबंदी ही मालक वर्गाकडून होत असते. संप कामगार वर्गाकडून आपल्या मागण्या मान्य करुन घेण्यासाठी होत असतो.त्या संपाच्या निरनिराळ्या अवस्था असतात.मालकावर कारखान्यातील उत्पादन बंद झाल्याने होणाऱ्या नुकसानात वाढ होवू नये म्हणून मालक पुर्वसूचना देवून टाळेबंदी करतात.

**सारांश :**

मालक व कामगार यांचा संघर्ष सुरु झाल्यानंतर सामाजिक हितासाठी शासनाला ध्यसस्थी करणे भाग पडत. संप व टाळेबंदी यामुळे सार्वजनिक सुरक्षितता, शांतता व सुव्यवस्था यांचा प्रश्न निर्माण होतो. सार्वजनिक हित लक्षात घेऊन शासन विविध प्रकारे कारवाई करते. मालक व कामगार यांनी एकत्र येवून आपापसात चर्चा करुन प्रश्न सोडवणे अधिक सोयीस्कर ठरते. धर्म जात, भाषा, राजकारण, नेतृत्वाची अभिलाषा, मालकाची फोडाफोडी धोरणे, यामुळे मालक व मजूर तंटा आणि त्यातून निर्माण होणारी संप व टाळेबंदी हा आधुनिक जीवनाचा अविभ्याज घटक बनलेला आहे.आज बाजारात स्पर्धा इतकी जीवघेणी झाली आहे. की, संपामुळे वस्तुंच्या उपलब्धतेवर काहीही परिणाम होत नाही वस्तूची टंचाई झाल्यास व्यापारी परदेशातुन वस्तु आणतात.

संप आणि टाळेबंदी परस्परावर अवलंबून आहेत. संपाला आज लोकशाहीमध्ये कायदेशिर मान्यता मिळालेली आहे. टाळेबंदीमुळे कामगारांचे अगणित नुकसान होऊ शकते.सार्वजनिक क्षेत्राच्या तुलनेत खाजगी नुकसानीचे प्रमाण जास्त असते. संप किंवा टाळेबंदी हे औद्योगिक संघर्ष म्हणजे एक आपत्ती होय.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) प्रा. ए.पी.चौधरी & इतर : आपत्ती व्यवस्थापन, प्रशांत पब्लीकेशन, जळगाव

२) डॉ.के.यू. घोरमोडे : आपत्ती व्यवस्थापन , विद्या प्रकाशन नागपूर

३) लोकराज्य ऑक्टोबर २००५, स्टेंबर २००८

४) आपत्ती विशेषांक २०१० - २०११

☐☐☐

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)

# 62

# दुष्काळ आपत्तीचे स्वरूप व व्यवस्थापन

**प्रा.डॉ.मादळे आर.बी.,**
सहा.प्राध्यापक भूगोल,
संलग्नित—स्वा.रा.ती.म.वि., स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद ता.मुखेड जि.नांदेड

**********

**प्रस्तावना :**

दुष्काळ ही महाभयानक नैसर्गिक आपत्ती आहे. त्या दुष्काळी परिस्थितीचे स्वरूप तीव्र किंवा सौम्य प्रकारचे असू शकते. सामान्यपणे ज्या प्रदेशात वार्षिक सरासरी पाऊस मानाच्या ७५ टक्के पेक्षा कमी पाऊस पडतो, त्या प्रदेशात दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. पावसाचे प्रमाण अतिशय कमी म्हणजे २० ते ३० टक्केपर्यंत किंवा त्यापेक्षा कमी असेल तर दुष्काळाचा फटका जबरदस्त असतो. भारतामध्ये अनेक वेळा अनेक ठिकाणी दुष्काळ पडून मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी झालेली आहे. गुजरातसारख्या राज्यात दुष्काळामुळे लाखो लोकांची हानी झालेली आहे. १९७१ च्या सुमारास ओरिसा, आंध्र आणि पश्चिम बंगालमध्ये दुष्काळी परिस्थितीत सुमारे ५० दशलक्ष लोक संकटात ओढवले गेले.

दुष्काळ किंवा अवर्षण ही पर्यावरणातील वातावरण व हवामानविषयक घटकांद्वारे उद्भवणारी आपत्ती होय. जगातील १/३ क्षेत्रात पावसाच्या दुर्भिक्ष्यामुळे अवर्षण ही कायमची आपत्ती आहे. प्रसिद्ध विचारवंत माल्थस यांनी लोकसंख्येला आळा घालणारी ही नैसर्गिक आपत्ती असल्याने म्हटले आहे. अवर्षण ही मानवावर ओढवणारी अत्यंत भयानक पर्यावरणीय आपत्ती आहे. ज्या देशातील शेती उत्पन्न पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे त्या देशात अवर्षणामुळे अतोनात नुकसान होते. या आपत्तीचा